मुद्रांक शुल्क रू. ३४,०००/-

# शेतजमीन भाडेचिठ्ठीचा नोंदणीकृत करारनामा

(मुदत – २९ वर्षाकरीता, दिनांक ०१/१२/२०२२ ते ०१/१२/२०५१)

**गावाचे नाव – गाजीपुर**

**पं.स.दारव्हा जि.प.यवतमाळ हद्दीमधील**

**भाडे करानामा लिहुन घेणार :-** **भुमिभक्ती फार्मस प्रोड्युसर कंपनी लि. महागांव (कसबा) तर्फे**
**पंकज कृष्णराव भोयर**
वय अं. ३५ वर्षे, धंदा – शेती
रा.गाजीपुर पो.देऊरवाडी
ता.दारव्हा जि.यवतमाळ ४४५११०
आधार कार्ड क्र. ४१३३ २२३८ २७६५
मो.नं. ९६२३४९८२१८
Pan No. AAKCB1004G
CNI : U01100MH2021PTC366559

**भाडे करारनामा लिहुन देणार :-** **भगवंत पांडूरंग राऊत**
वय अं. ५० वर्षे, धंदा – शेती
रा.गाजीपुर पो.देऊरवाडी
ता.दारव्हा जि.यवतमाळ ४४५११०
आधार कार्ड क्र. ६६३० ३९३७ १३१३
मो.नं. ९८८१५१८२६३
Pan No. AYHPR6005M

दस्त क्र 2800
पाने 3/१८
2022

ई.सन २०२२ साल कारणे शेतजमीनीचा २९ वर्षाकरीता भाडे करारनाम्याचा

नोंदणीकृत लेख लिहून देतो ते येणेप्रमाणे :-

**माझ्या मालकीच्या व ताब्यातील शेतजमीनीचे वर्णन –**

मौजा गाजीपुर ता.दारव्हा जि.यवतमाळ येथील शेत –

| भुमापन क्र. | हे.आर. | आकार रू. | भो.वर्ग |
|---|---|---|---|
| ८६ | २–२५<br>०–१६ पो.ख. | ७.५० | १ |

या शेतजमीनीपैकी माझ्या मालकीची व ताब्यातील शेत –

| भुमापन क्र. | हे.आर. | आकार रू. | भो.वर्ग |
|---|---|---|---|
| ८६ | १-४२ | ५.०९ | १ |

या शेतजमीनीमधील देऊरवाडी रोडला लागुन ०-३० हे.आर. शेतजमीन मी तुम्हास २९ वर्षाकरीता स्मार्ट प्रकल्प उभारण्याकरीता खालील शर्ती व अटीवर भाडे तत्वावर देत आहे.

**सदर शेतजमीनीचे वार्षीक भाडे २५,०००/- (पंचविस हजार रूपये)**

सदर करारनामा दि. ०१/१२/२०२२ ते ०१/१२/२०५१ (एक डिसेंबर दोन हजार बावीस ते एक डिसेंबर दोन हजार एक्कावन) पावेतो अस्तीत्वात राहील. या मुदतीनंतर सदर भाडे करार आपोआप संपुष्टात येईल व शेतजमीन आपोआप माझ्या ताब्यात येईल.

सदर शेतजमीनीचे भाडे तुम्ही मला वार्षीक इंग्रजी महिण्याच्या डिसेंबर महिन्याच्या ५ तारखेपर्यंत रोख स्वरूपात किंवा कंपनीचे नियमाप्रमाणे देणार असे कबुल केले आहे. भाडे दिल्यानंतर मी तुम्हास त्याबाबत पावती देईल. भाडे देण्यास तुम्ही विलंब करणार नाही अशी तुम्ही मला खात्री दिली आहे. ३ वर्षाचे भाडे थकल्यास तुम्ही मला विना विलंब सदर शेतजमीन परत देणार त्यात तुम्ही कोणतीही भानगड करणार नाही. सदर शेतजमीन तुम्ही ज्या प्रकल्पाकरीता भाड्याने घेतली तोच प्रकल्प तुम्ही **भुमिभक्ती फार्मस प्रोड्युसर कंपनी लि. महागांव** च्या नियमानुसार करावा.

सदर प्रकल्प उभारणीकरीता तुम्ही ज्या सोईसुविधा तुमच्या कंपनीच्या नियमानुसार करावयाच्या आहेत त्या कराव्या, त्यास माझी हरकत होणार नाही, संमती राहील. सदर शेतजमीनीमध्ये तुम्हास प्रकल्पाकरीता काही बांधकाम करावयाचे असल्यास ते तुम्ही करू शकता, त्यास माझी हरकत होणार नाही.

सदर प्रकल्प तुम्ही मध्येच सोडल्यास १ वर्षाचे (एक वर्षाचे) भाडे तुम्ही मला देणार असे ठरले आहे. त्यात तुम्ही काहीही भानगड करू नये. तसेच मी तुम्हास भाडेतत्वाने दिलेली ०-३० हे.आर. शेतजमीन सदर उक्त करारनाम्याची मुदत संपुष्टात येईपावेतो विक्री करणार नाही.

**सदर शेतजमीनीची चतु:सिमा :-**

पुर्वेस :- गाजीपुर गाव (वस्ती)

पश्चिमेस :- छगन ठाकरे यांचे शेत

उत्तरेस :- कृष्णराव भोयर यांचे शेत

2800

अशा चतु:सिमेच्या आतील शेतजमीन मी तुम्हास वरिल सर्व अटी व शर्तीवर भाड्याने दिले आहे. कोणतीही अट मोडण्यास करारभंग समजल्या जाईल व ती मला कबुल असेल. सदरील करारनामा २९(एकोणतिस) वर्षाकरीता नोंदणीकृत करून दिलेल्या आहे.

करीता आज रोजी माझे राजीखुशीने, चांगल्या अवस्थेत व उत्तम अशा मनस्थितीत पंचासमक्ष दारव्हा येथे मी तुम्हास हा नोंदणीकृत भाडे करारनामा लेख लिहुन दिला तो मला व माझे इस्टेट वारसास लागु व कबुल असे.

दस्तुर : ए.ई.देशमुख

दिनांक : ०५/१२/२०२२

लिहून देणाराची सही

(भगवंत पांडूरंग राऊत)



दु द व
दस्त क्र. 2600
पृष्ठ ५/१९
2022

लिहून घेणाराची सही

भूमिशक्ती फार्मस प्रोड्युसर कंपनी लि.महागांव
तर्फे पंकज कृष्णराव भोयर





साक्षदार :-

१) ______________

(प्रशांत मोतीराम आगाशे)



२) ______________

(केतक अशोकराव भालेराव)